तथापि ट्रस्ट
स्त्रिया आणि आरोग्य संसाधन संवर्धन

## चुकीचा प्रश्न –

माझ्या मतीमंद
मुलामध्ये/मुलीमध्ये लैंगिक
इच्छा निर्माणच होणार नाहीत
यासाठी काय करू?

## योग्य प्रश्न –

माझ्या मतीमंद
मुलाच्या/मुलीच्या,
त्याच्या/तिच्या क्षमतेनुसार,
लैंगिकतेच्या अभिव्यक्तीसाठी
मला काय करता येईल
जे आपल्या सामाजिक
पर्यावरणाशीही सुसंगत असेल?

तथापि ट्रस्ट
स्त्रिया आणि आरोग्य संसाधन संवर्धन

# लैंगिकता शिक्षणाचा अर्थ

लैंगिक संबंधांची परवानगी
असा होत नाही,

**तर**

एक प्रौढ व्यक्ती म्हणून आपले
आयुष्य आनंदी, सुरक्षित आणि
जबाबदारपणे जगण्यासाठी
गोष्टी शिकण्याची, समजून
घेण्याची आणि तसे वागण्याची
संधी मिळणे असा आहे.

तथापि ट्रस्ट
स्त्रिया आणि आरोग्य संसाधन संवर्धन

# अपंगत्व आणि लैंगिकता

या लपवण्याच्या किंवा
नाकारण्याच्या गोष्टी नाहीत

**तर**

त्यांचा स्वीकार, त्या विषयी
उघडपणे बोलणे आणि
समजून घेऊन वागणे
महत्वाचे आहे.

तथापि ट्रस्ट
स्त्रिया आणि आरोग्य संसाधन संवर्धन

# तरुण आणि प्रौढ मतिमंद मुलांना त्यांच्या वयानुसार अर्थपूर्ण लैंगिक शिक्षण देणं का महत्वाचं आहे?

१. इतरांना जी माहिती असते ती सर्व माहिती या मुलांनाही देणं गरजेचं आहे.

२. ती तशी असेल तर घर, शाळा, कामाचे ठिकाण आणि त्यांचा परिसर या सर्व ठिकाणी ते अधिक सक्षमपणे वावरू शकतात.

३. लैंगिक शोषण ओळखणे आणि त्या विरुद्ध तक्रार करण्याविषयी प्रशिक्षित आणि सजग असतील तर ते अधिक सुरक्षित राहू शकतील.

४. मुलं जरी बुद्धीने मागे राहिलेली असली तरी त्यांचे शरीर, भावना आणि प्रेरणा त्याच असू शकतात ज्या सामान्य समजल्या जाणाऱ्या मुलांच्या असतात.

५. लैंगिक शिक्षणातून शरीराबद्दलचे वास्तव काय आहे ते समजते ज्यातून अनेक गैरसमज आणि भीती दूर होतात.

६. माणसाच्या आयुष्यात लैंगिकता शिक्षणातून गुणवत्तापूर्ण बदल होतात. सर्वच मुलांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी, नातेसंबंध सांभाळताना आणि एकूणच समाजात वावरताना ही एक महत्वाची गोष्ट आहे.

७. सगळेच मोठे होतात पण निव्वळ वयाने मोठी होण्यापेक्षा आपली मुलं समजेने मोठी होणं अधिक महत्वाचं नाही का!

८. लैंगिकता शिक्षणाची जबाबदारी केवळ इंटरनेट आणि वेबसाईट वर कशाला सोडायची? आपणही पुढाकार घेऊ यात की!

९. टीव्ही, सिनेमे, जाहिराती असू द्या नाही तर दुकानं, मॉल, आपलं सगळ जगंच अत्याधिक लैंगिक झालेलं आहे. अशा वेळी पालक हेच सर्वप्रथम मुलांच्या लैंगिक आणि सामाजिक विकासावर प्रभाव टाकू शकतात.

१०. आणि शेवटी सर्वात महत्वाचे म्हणजे – लैंगिकता हा आपल्या जीवनाचा, आपल्या संस्कृतीचा आणि एकूणच मानवतेचा सहज–स्वाभाविक आणि आनंदी हिस्सा नेहमीच राहिलेला आहे.